SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000 PGBUTR-0231 2609296/9139,
www.unishivaji.ac.in, pgbutr@gmail.com
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४,
महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९००० दूरध्वनी पी. जी.बी.यु.टी.आर.- ०२३१
२६०९२९६/९१३९, www.unishivaji.aic.in, pgbutr@gmail.com

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र. शिवाजी विद्यापीठ/पीजी.बीयुटीआर/पीएच.डी/ 8793 दि. 12 MAY 2026

प्रति,
मा.अधिविभागप्रमुख/मा. संचालक/मा.समन्वयक
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - पीएच.डी. कोर्सवर्क आयोजनाबाबत

संदर्भ- १) शिवाजी वि/अ.म./५८० दि. ०३/०८/२०२३ रोजीचे पत्र
२) जा.क्र.एसयु/पीजी/बीयुटीआर/२९०५ दि. १३/०९/२०२४ रोजीचे पत्र
३) जा.क्र.पीजीबीयुटीआर विभाग/६६७६ दि. १२/०६/२०२५ रोजीचे परिपत्रक

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठातील विविध अधिविभागामध्ये तसेच, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये पीएच.डी. संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांचे कोर्सवर्क ऑनलाईन मोडव्दारे घेण्याबाबतची कार्यवाही करावी. सदरची कार्यवाही करत असताना खालीलप्रमाणे सूचनांचे अवलोकनी घेवून कोर्सवर्क आयोजित करण्याची कार्यवाही करावी.

१. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) च्या ०७ नोव्हेंबर २०२२ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार ज्या-त्या शैक्षणिक वर्षामध्ये कोर्सवर्क आयोजित करण्याची कार्यवाही संबंधीत अधिविभागाने करावयाची आहे.
२. पीएच.डी. कोर्सवर्क करीता विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तसेच, विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील मान्यताप्राप्त मार्गदर्शकांची व्याख्याने ऑनलाईन मोडव्दारे/माध्यमाव्दारे आयोजित करावीत.
३. कोर्सवर्कच्या आयोजनास मान्यता घेताना अधिविभागाचे Covering letter, कोर्सवर्कचे नियोजित वेळापत्रक, निमंत्रित तज्ञांची यादी, कोर्सवर्क करीता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची यादी, इत्यादी कागदपत्रांवर अधिविभागप्रमुखांची स्वाक्षरी घेवून किमान १५ दिवस अगोदर प्रस्ताव पीजीबीयुटीआर विभागास पाठवून दयावेत व मान्यता प्राप्त झाल्यानंतर कोर्सवर्कचे आयोजन करावे.
४. ज्या विषयाकरीता संशोधक विद्यार्थी कमी असल्यास त्या विषयाचा अभ्यासक्रम सारखा असल्याची खात्री करून घ्यावी व कोर्सवर्कचे आयोजन सामायिक पध्दतीने घ्यावे.
५. कोर्सवर्कसाठी उपस्थित असलेल्या पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शकांचे, विषयतज्ञांची ऑनलाईन/ऑफलाईन उपस्थिती अधिविभागामध्ये जतन करून ठेवावी.
६. कोर्सवर्क आयोजनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सर्व कागदपत्रांवर/देयक प्रस्तावावर अधिविभागप्रमुखांची स्वाक्षरी घेवून ते प्रस्ताव लेखा विभागाकडून तपासून घ्यावेत व त्रुटी विरहित मानधन देयक प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी पीजीबीयुटीआर विभागास सादर करावेत
७. जा.क्र.शिवाजी विद्यापीठ/आस्थापना पीजी/११४५ दि. ०७/१०/२०१९ रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे विषयतज्ञांचे मानधन निश्चित करावे.

कळावे,

आपला विश्वासू

( श्री. विलास एस. सोयम )
उपकुलसचिव

प्रत- १) मा. कुलगुरू कार्यालय यांना माहितीसाठी
२) मा. प्र-कुलगुरू कार्यालय यांना माहितीसाठी
३) मा.कुलसचिव कार्यालय यांना माहितीसाठी
४) मा. संचालक, मध्यवर्ती मुल्यमापन मंडळ यांना माहितीसाठी,
५) बी.एस्सी. परीक्षा विभाग यांना माहितीसाठी.